# महाराष्ट्र शासन

## महसूल व वन विभाग

# नागरिकांची सनद

महसूल व वन विभाग
मंत्रालय, मंबई-४०० ०३२.

# नागरिकांची सनद

**प्रस्तावना:-**

शासनाकडून जनतेला विविध प्रकारच्या सेवा उपलब्ध करुन दिल्या जातात परंतु त्या सेवांची पुरेपुर माहिती सर्वसामान्य जनतेला नसते. तसेच या सेवा कमीत कमी वेळेत मिळाव्यात, त्या उचित दर्जाच्या असाव्यात अशी जनतेची माफक अपेक्षा असते. तसेच शासकीय कामकाजात सूधारणा करणे, पारदर्शकता आणणे व भ्रष्टाचाराला आळा घालून लोकांच्या प्रती दायित्व वाढविणे, या उद्दीष्टांचे पुर्तीकरीता नागरिकांची सनद (सिटीझन चार्टर) अंमलात आणण्याचे शासनाने ठरविले आहे.

महसूल व वन विभागाने यापूर्वी प्रसिध्द केलेल्या नागरिकांच्या सनदेत यथायोग्य सुधारणा करण्यात येऊन त्याप्रमाणे सुधारित नागरिकांची सनद प्रसिध्द करण्यात येत आहे.

## २. महसूल व वन विभागाची रचना:-

महसूल व वन विभाग हा महाराष्ट्र शासनाचा अत्यंत महत्वाचा विभाग आहे. महसूल व वन विभागात खालीलप्रमाणे ४ उप विभाग आहेत.:-

१) महसूल.
२) वने.
३) मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन.
४) अपिल व रिव्हीजन.

“महसूल विभागाकरिता प्रशासकीय विभाग प्रमुख हे अपर मुख्य सचिव, वने उप विभागाकरिता प्रशासकीय विभाग प्रमुख हे प्रधान सचिव, अपिल व रिव्हीजन करिता प्रशासकीय विभाग प्रमुख हे अपर मुख्य सचिव व मदत व पनुर्वसन उप विभागाकरिता प्रशासकीय विभाग प्रमुख हे सचिव, आहेत.” विभागातील सर्व विषयांची विभागणी करुन या प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे दर्शविण्यात आलेली आहे.

**महसूल व वन विभागाची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे:-**

सुरुवातीच्या काळात प्रामुख्याने जमीन महसूल, कायदा आणि सुव्यवस्था यांच्याशी महसूल प्रशासनाचा संबंध होता. त्यानंतर झालेल्या प्रगतीमुळे महसूल विभागाच्या कार्यक्षेत्रात अमुलाग्र बदल झाला आहे. जिल्हाधिकारी हे जिल्हयातील सर्व महसूल प्रशासनाचे प्रमुख असून ते जिल्हादंडाधिकारी देखील असतात. जिल्हाधिकारी हे जिल्हयातील शासनाचे प्रतिनिधी म्हणून कार्यरत असतात. जिल्हयातील सर्व महसूल यंत्रणा विविध प्रकारची कामे पुर्णत्वास आणण्यासाठी त्यांना सहाय्य करते.

महसूल व वन विभागांतर्गत जे उपविभाग येतात त्यापैकी भूमि अभिलेख हा एक उप विभाग आहे. सदर विभाग जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख यांच्या नियंत्रणाखाली असतो व तेच या उप विभागाचे प्रमुख म्हणून काम पाहतात आणि विभागाच्या प्रशासनावर व क्षेत्र संरचनेवर नियंत्रण ठेवतात.

नोंदणी अधिनियम, १९०८ ची अंमलबजावणी करणेसाठी मुख्यत: नोंदणी व मुद्रांक विभाग स्थापित करण्यात आला आहे. दिनांक १.१०.१९८८ पासून नोंदणी व मुद्रांक विभागाचे एकत्रीकरण करुन नोंदणी व मुद्रांक विभाग असे नामांकन केले आहे. ह्या विभागाचे प्रमुख म्हणून नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, हे आहेत.

पर्यावरणासाठी वनसंरक्षण व वन संवर्धन हे अत्यंत महत्वाचे आहे. वनातील कामे मूलत: श्रमाभिमुख आहेत आणि वनक्षेत्र विकासविषयक कार्यक्रमांमुळे विशेषत: त्या प्रदेशातील रोजगारक्षमतेत मोठी वाढ होते आणि त्यायोगे आदिवासी आणि आदिवासीतर लोक यांच्या कल्याणात मोठी मदत होते. या खेरीज वांरवार पाणी टंचाई होणाऱ्या प्रदेशातील वनाची स्थिती सुधारण्याविषयक वन संरक्षण कार्य अति महत्वाचे आहे व त्याचे महत्व आणखी विषद करण्याची आवश्यकता नाही.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ व सदर अधिनियमाच्या अंतर्गत स्थापित राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (SDMA) मार्फत राज्यात उद्भवणा-या कोणत्याही आपत्तीचे प्रभावी व तत्पर व्यवस्थापन करण्याची कार्यवाही करण्यात येते. त्याकरिता राज्य आपत्ती प्रतिसाद दल (SDRF) स्थापन करण्यात आले आहे.

मदत व पुनर्वसन उपविभागामार्फत राज्यातील प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसनासंबंधी धोरणात्मक बाबीकरिता निर्णय घेऊन, प्रकल्पबाधीत व्यक्तींचे पुनर्वसन केले जाते.

महसूल व वन विभाग व या विभागाच्या नियंत्रणाखालील असलेले विविध कार्यालये/उपक्रम यांची जबाबदारी लक्षात घेता या विभागास अनन्य साधारण महत्व प्राप्त झाले आहे. या विभागांतर्गत उपलब्ध सेवांचा तपशील, त्या पुरविण्यासाठी आवश्यक ती कालमर्यादा, सेवा पुरविणारा अधिकारी व सदर सेवेचा लाभ मिळण्यास अडचण निर्माण झाल्यास नागरीकांनी संपर्क साधावयाचा अधिकारी इत्यादी माहिती दर्शविणारी सोबतची नागरिकांची सनद तयार करण्यात आली आहे.

## ३. नियम /शासन निर्णय:-

या विभागाशी संबंधित नियम अथवा महत्वाचे शासन निर्णय www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. या विभागाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या नियम तथा शासन निर्णयाबाबतची माहिती www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी अद्ययावत करण्यात येते.

## ४. गाऱ्हाणी तक्रारी यांचे निराकरण:-

कार्यपूर्तीस होणारा विलंब वा अन्य काही गाऱ्हाणी असल्यास त्यासंबंधी संबंधित कार्यासनांच्या सह/उप सचिव यांचेकडे तक्रार नोंदविता येईल व तक्रार प्राप्त झाल्यापासून तक्रार निवारण करण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांची राहील. यानंतरही नागकरिकांचे समाधान न झाल्यास संबंधित अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव /सचिव यांच्याकडे याबाबत त्यांना तक्रार नोंदविता येईल. गाऱ्हाणी समक्ष भेटीत/पत्राने तथा ई-मेलद्वारेही मांडता येतील.

तसेच महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ आणि त्याअनुषंगिक शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम, २०१३ मधील तरतुदीनुसार प्रत्येक शासकीय कर्मचारी, त्यास नेमून दिलेले किंवा त्याच्याशी संबधित असलेले शासकीय कर्तव्य व शासकीय काम अत्यंत दक्षतेने आणि शक्य तितक्या शीघ्रतेने पार पाडण्यास बांधील असेल. त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन विभागाचे दि.३.१.२०१७ च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनेप्रमाणे विभागामार्फत देण्यात येणाऱ्या सेवाबाबतच्या तपशीलाचे विवरणपत्र जोडले आहे.

५. **उद्दीष्टये:-**

नागरिकांच्या सनदेचे उद्दीष्ट हे जनतेला कबूल केलेल्या तारखेस त्यांचे काम पूर्ण करणे हे असून ते साध्य करण्यासाठी हा उपक्रम शासनस्तरावर राबविण्यात येणार आहे. तसेच या सेवा पुरविताना नागरिकांना सौज्यन्यपूर्ण वागणूक देण्याची जबाबदारी प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्याची राहील.

दिनांक:- २९ डिसेंबर, २०२०.

(डॉ. नितिन करीर)
अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग.